नियमित दिवाणी दावा क्रमांक ०४/२०२४

सी.एन.आर. नंबर **MHRT**140000132024

# निशाणी ५२ खालील आदेश

## दि.११/०६/२०२४

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करुन घेणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.३ चे अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.३ यांचे नावे असलेली दाव्याची समन्स त्यांचे बहीणीने स्विकारली होती. परंतु त्याची माहीती प्रतिवादी क्र.३ यांना उशिरा देणेत आल्याने व प्रतिवादी क्र.३ हे मुंबई येथे वास्तव्यास असल्याने व मागील काही तारखांना आजारी असल्यामुळे न्यायालयात हजर राहु शकले नाही. त्यामुळे मुदतीत कैफियत देता आले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करुन घेणेची विनंती केली व तसे न झाल्यास प्रतिवादी क्र.३ हे न्यायापासून वंचित रहावे लागणार असून त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली. याउलट वादी यांनी सदर अर्जाचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांची कथने नाकारली आहेत. अर्जातील कारण योग्य व संयुक्तीक नसल्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली. दोन्ही बाजूच्या वकीलांनी त्यांच्या अर्ज व म्हणणेतील कथनाची पुनर्वत्ती करणारा युक्तीवाद केला.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर ताकिदीकरीता दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.३ यांचे विरुध्द एकतर्फा आदेश दि.१९/०३/२०२४ रोजी करणेत आला आहे. दाव्याचे स्वरुप पहाता, प्रतिवादी क्र. ३ यांची कैफियत अभिलेखावरती घेणे व त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल, परंतु त्याकरीता प्रस्तुत अर्जातील प्रतिवादी क्र. ३ चे नमुद कारण हे योग्य व संयुक्तीक आहे कि नाही हे पाहणे गरजेचे आहे.

४. अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.३ यांना मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करणे अशक्य झाल्याचे कथन केले आहे. प्रस्तुतच्या अर्जाचे पृष्ठ्यर्थ शपथपत्र दाखल केले आहे. बेलिफाचे अहवालानुसार नि.क्र.२२ वरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.३ करीता त्याचे बहिणीने समन्स स्विकारले होते. तसेच नैसर्गिक न्याय तत्वानुसार दोन्ही बाजूंच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर कोणताही अर्ज/दावा गुणदोषावरती निकाल करणे न्यायउचित आहे. प्रतिवादी क्र.३ यांचे कृत्यामुळे सदरच्या दाव्यास होणारा विलंब व वादी यांची गैरसोयीची नुकसान भरपाई पैशाच्या स्वरुपात करता येवू शकते.

५. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी क्र.३ ला दाव्यामध्ये त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही. प्रतिवादी क्र.३ यांनी कैफियत व म्हणणे देणेची संधी न दिल्यास त्यांचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा निकाल गुण दोषावरती लागणेसाठी दाव्यामध्ये दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत अर्जातील कारण व नैसर्गिक न्याय तत्वांचा विचार करता, प्रतिवादी क्र.३ यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब खालील आदेश करीत आहे.

## – आदेश –

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो व रक्कम रु. २००/– कॉस्ट म्हणून प्रतिवादी क्र.३ ने वादीस देणेच्या अटीवरती विना कैफियत दावा चालविणेचा आदेश रद्द करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.३ ला कैफियत दाखल करणेची परवानगी देणेत येते.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो. )

**ठिकाण – मंडणगड** **(श्री.एम.ए.शिंदे)**

**दि. ११/०६/२०२४.** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मंडणगड**

| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
|---|---|---|
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. D. R. Joshi |
| Date of Decision | :- | 11/06/2024. |
| Signed by P.O. on | :- | 11/06/2024. |
| Uploaded on | :- | 11/06/2024. |